नि.दि.दा.क्र.१०१/२०१८
नि.क्र.९२

<u>नि.क्र.९७ वरील अर्ज मंजूर झाल्याने उलटतपास प्रतिवादी क्र.१ करीता विधिज्ञ श्री. एम.पी. गवारे यांच्यावतीने शपथेवर सुरु</u> -

६. माझे शिक्षण इयत्ता दहावीपर्यंत झालेले आहे. या दाव्यात वादीने काय मागणी केलेली आहे याबाबत मला माहिती आहे. दावा मिळकत ही माझ्या आजोबांनी सुमारे १९९१ साली पूर्वीचे मालक गंगुबाई यांच्याकडून विकत घेतली होती. दावा मिळकतीवर बांधकाम करण्याकरीता गंगुबाई हिने परवानगी घेतली होती. परवानगीचा तो कागद मी पाहिलेला व वाचलेला आहे. ती परवानगी गंगुबाई हिने १९८८ साली घेतली होती. त्या परवानगीची मुदत किती होती हे मला आता सांगता येणार नाही. त्या परवानगीची मुदत एक वर्षाकरीता होती, याबाबत मला सांगता येणार नाही.

७. सन १९९१ पूर्वी दावा मिळकतीवर कश्या स्वरुपाचे बांधकाम होते याबाबत मी सांगू शकतो. माझ्या म्हणण्याप्रमाणे त्या ठिकाणी चार खोल्यांचे पक्क्या स्वरुपाचे बांधकाम होते. सन १९९१ पूर्वी दावा मिळकतीवर चार खोल्यांचे पक्क्या स्वरुपाचे बांधकाम होते हे दाखविण्याकरीता मी कागदोपत्री पुरावा दाखल करु शकतो. ते कागदपत्र मी **<u>नि.क्र.३२</u>** वर दाखल केलेले आहे. आता मला **<u>नि.क्र.३२</u>** वरील यादी दाखविली असता त्यामध्ये सन १९९१ पूर्वी दावा मिळकतीवर चार खोल्यांचे पक्क्या स्वरुपाचे बांधकाम होते ही बाब दर्शविणारा कोणताही कागद नाही.

८. आजरोजी मी स्वतः दावा मिळकतीमध्ये राहतो. प्रतिवादी क्र.१ यांनी दावा मिळकतीमध्ये असलेल्या बेकायदेशीर बांधकामाबाबत नोटीस पाठविली होती, याबाबत मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र.१ यांनी दावा मिळकतीमध्ये असलेल्या बेकायदेशीर बांधकामाबाबत पाठविलेली कोणतीही नोटीस मला मिळालेली नाही. प्रतिवादी क्र.१ यांनी पाठविलेली नोटीस आमच्या कुटूंबातील कोणत्या सदस्याला मिळाली होती, हे मी सांगू शकत नाही. मी स्वतःच्या नावाने प्रतिवादी क्र.१ यांच्याकडे दावा मिळकतीवरील बांधकाम नियमीत करुन मिळण्याबाबत दि.०४/०८/२०१८ रोजी अर्ज केलेला आहे.

**<u>प्रश्न</u>** – तो अर्ज तुम्ही प्रतिवादी क्र.१ यांनी नोटीस पाठविल्यानंतर सादर केला होता का ?
**<u>उत्तर</u>** – अशी कोणतीही नोटीस आम्हांला मिळालेली नाही.

९. सन १९९१ मध्ये दावा मिळकतीवरील बांधकामाची जी परिस्थिती होती तीच परिस्थिती आज देखील आहे.

**<u>प्रश्न</u>** – सन १९९१ मध्ये दावा मिळकतीवरील बांधकामाची जी परिस्थिती होती तीच परिस्थिती आज देखील आहे तर दि.०४/०८/२०१८ रोजी तुम्ही प्रतिवादी क्र.१ यांच्याकडे अर्ज का सादर केला ?

**<u>उत्तर</u>** – दि.३१/०५/२०१८ रोजी दुपारी १२.०० च्या सुमारास प्रतिवादी क्र.१ यांनी दावा मिळकतीवर अतिक्रमणाची कारवाई केली होती. त्याबाबतीत आम्ही मा.उच्च न्यायालयात गेलो व प्रतिवादी क्र.१ यांनी कारवाई करु नये म्हणून आदेश पारीत केले.

१०. प्रतिवादी क्र.१ यांनी नोटीस दिल्यानंतर वादीने श्रीरामपूर येथील न्यायालयात दावा दाखल केला की उच्च न्यायालयात दाद मागितली, याबाबत मला माहिती नाही. प्रतिवादी क्र.१ यांनी वादीला का नोटीस पाठविली, याबाबत मला माहिती नाही. वादीने मला या दाव्यात प्रतिवादी क्र.१ यांनी पाठविलेल्या नोटीसबाबत कसलीही माहिती दिलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आणि वादी आम्ही दोघांनी मिळून दावा मिळकतीवर अनाधिकृत बांधकाम केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, या अनाधिकृत बांधकामाबाबत मी आणि वादी आम्ही दोघांनी प्रतिवादी क्र.१ यांच्याकडे ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर केला. हे म्हणणे खरे नाही की, सदरचा अर्ज प्रतिवादी क्र.१ यांनी नामंजूर केल्याचे आम्हां दोघांना माहित आहे.

११. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र.१ यांनी जेसीबीच्या साहयाने दावा मिळकतीची संरक्षक भिंत आणि पॅरापिट पाडले होते. या कारवाईच्या वेळेस मी स्वतः त्या ठिकाणी हजर होतो. हे म्हणणे खरे नाही की, त्या कारवाईच्या वेळेस मी आणि आमच्या कुटूंबातील सदस्यांनी प्रतिवादी क्र.१ यांच्या अधिका-यांशी वादविवाद केला आणि कारवाईमध्ये अडथळा निर्माण करण्याचा प्रयत्न केल्याने आमच्याविरुध्द गुन्हा दाखल केला. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र.१ यांनी पाडकामाची कारवाई केल्यानंतर

आम्ही पुन्हा त्या ठिकाणी पूर्वीप्रमाणे बांधकाम केले. प्रतिवादी क्र.१ यांनी आजपावेतो सन १९९१ पासूनचे बांधकाम नियमित करण्याबाबतची परवानगी दिलेली नाही, याबाबत मला सांगता येणार नाही.

१२. दावा मिळकतीमध्ये नविन बांधकाम करण्याकरीता आम्ही प्रतिवादी क्र.१ यांच्याकडे बांधकाम आराखडा दाखल केला आहे. तो बांधकाम आराखडा माझा लहान भाऊ नामे स्वामीनाथ अनिल शर्मा याने दाखल केला आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्यास देखील प्रतिवादी क्र.१ यांनी अद्याप परवानगी दिलेली नाही. प्रतिवादी क्र.२ हा देखील माझा चुलता आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र.१ यांच्याकडून परवानगी मिळण्याच्या उद्देशाने दावा दाखल केल्यानंतर वादी व प्रतिवादी क्र.२ यांनी हातमिळवणी केली. दावा मिळकतीवर सन १९९१ पूर्वी कच्चया स्वरुपाचे बांधकाम होते असे म्हटल्यास ते योग्य राहणार नाही. दावा मिळकतीवर आजरोजी अस्तित्वात असलेली इमारत आमच्या कुटूंबियांनी बांधली असे म्हणणे योग्य राहणार नाही.

१३. दावा मिळकतीवर सध्या अस्तित्वात असलेल्या बांधकामाचे छायाचित्र मी वादीला विचारुन दाखल करु शकतो. (तुम्ही वादीला कधी विचारता ? हा प्रश्न विचारल्यावर वादीचे विधिज्ञ यांनी हा प्रश्न योग्य व कायदेशीर राहणार नाही असे सांगितले. साक्षीदाराच्या सरतपासाचे अवलोकन केले असता त्याने संपूर्णपणे वादीच्या साक्षीप्रमाणे साक्ष दिल्याचे दिसून येते. त्याचप्रमाणे साक्षीदाराने आज उलटतपासा दरम्यान त्यास दाव्या संबंधी संपूर्ण माहिती असल्याचे शपथेवर सांगितल्यामुळे हा प्रश्न अयोग्य अथवा बेकायदेशीर ठरत नाही. उलट अभिलेखावर जर छायाचित्र दाखल झाल्यास ते न्यायदानाच्या कामात मदत करेल.)

(वादी हे न्यायदान कक्षात हजर आहे. त्यामुळे प्रकरण लवकरात लवकर संपविण्याच्या उद्देशाने साक्षीदारास वादीला न्यायालयाच्या बाहेर जाऊन छायाचित्र दाखल करायचे किंवा कसे याबाबत चर्चा करण्याची मुभा देत आहे.)

**साक्षीदार हा वादीला विचारण्याकरीता न्यायदान कक्षाच्या बाहेर जात असल्याने उलटतपास तहकूब.**

**उलटतपास प्रतिवादी क्र.१ करीता विधिज्ञ श्री.एम.पी. गवारे**

**<u>यांच्यावतीने पुन्हा शपथेवर सुरु</u> -**

१४.	मी दावा मिळकतीवरील बांधकामाची आजरोजीची परिस्थिती दर्शविणारे छायाचित्र दाखल करु शकतो. त्या छायाचित्रांवर छायाचित्र काढल्याची तारीख, वेळ, अक्षांश आणि रेखांश नमूद असेल. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतीवर आज देखील अनाधिकृत व बेकायदेशीर बांधकाम अस्तित्वात आहे. हे म्हणणे खरे नाही की, वादीला मदत करण्याकरीता व दावा मिळकतीवरील अनाधिकृत बांधकाम वाचविण्याच्या उद्देशाने पुराव्याचे खोटे शपथपत्र दाखल केले व खोटी साक्ष देत आहे.

**<u>उलटतपास पूर्ण.</u>**

**<u>फेरतपास नाही.</u>**

श्रवणोत्तर स्विकृत,

Digitally signed by ASHISH BIHARILAL MARLECHA
Date: 2025.11.05 17:12:44 +0530

(आशिष बि. मरलेचा)

दिनांक ०५/११/२०२५

दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
श्रीरामपुर, जि.अहमदनगर